जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३६ दिनांक - १३/०१/२०२४**

लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर

## देशी बनावटीचे पिस्टल जवळ बाळगणा-या दोन इसमांना केले जेरबंद

दि.१२/०१/२०२४ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकंद पोलीस स्टेशन, श्री. विश्वजीत काइंगडे, यांनी तपास पथकाचे अधिकारी सपोनि रविंद्र गोडसे व तपास पथकातील पोलीस अंमलदार जाधव, पोलीस अंमलदार साळुंके, फरांदे, साळवे यांना पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने वरील अधिकारी व अंमलदार लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत असताना पोलीस नाईक कैलास साळुंके यांना त्यांचे गोपनीय खब-यामार्फत बातमी मिळाली की, केसनंद थेऊर रोडवरील कोलवडी येथील दर्ग्याजवळ असलेल्या जयभवानी स्वीट्स या दुकाना समोरील मोकळया जागेत काळया रंगाचे जॅकेट व निळया रंगाची पॅन्ट घातलेली एक इसम उभा असुन त्याचेजवळ एक देशी बनावटीचे पिस्टल आहे. लागलीच पोलीस अंमलदार साळुंके यांनी सदरची बातमी तपास पथकाचे सपोनि रविंद्र गोडसे यांना सांगितली असता त्यांनी सदरची बातमी श्री. विश्वजीत काइंगडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर यांना दिली असता त्यांनी कायदेशिर कारवाई करणेबाबत आदेशित केले.

त्याप्रमाणे सपोनि रविंद्र गोडसे व स्टाफ यांनी मिळालेल्या बातमीची खात्री करुन केसनंद थेऊर रोडवरील कोलवडी येथील दर्ग्याजवळ असलेल्या जयभवानी स्वीट्स या दुकाना समोरील मोकळया जागेत काळया रंगाचे जॅकेट (हुडी) व निळया रंगाची पॅन्ट घातलेल्या संशयित इसम नामे **सागर बाळासाहेब गाढवे, वय २८ वर्ष, रा. गाढवे मळा, थेऊर फाटा, कुंजीरवाडी, ता. हवेली, जि. पुणे** यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यात ०१ देशी बनावटीचे पिस्टल मिळुन आल्याने त्याचेविरुध्द लोणीकंद पोलीस स्टेशनला आर्म ॲक्ट व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. नमुद आरोपीकडे चौकशी केली असता त्याने सदरचे शस्त्र त्याचा साथीदार नामे **योगेश जयसिंग झेंडे, वय ३५ वर्षे रा. भेकराईनगर,शिवशंकर मंगल कार्यालया शेजारी, फुरसंगी** याचेकडे घेवुन सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले असुन दोन्ही आरोपीतांना सदर गुन्हयात अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असुन मा. न्यायालयाने त्यांना दिनांक १५/०१/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. रंजन कुमार शर्मा , मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ ४, पुणे शहर, श्री. शशीकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग, पुणे शहर श्री. संजय पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर श्री. विश्वजीत काइंगडे, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सपोनि रविंद्र गोडसे, सपोफौ बाळासाहेब सकाटे, पोलीस अंमलदार तिकोणे, स्वप्नील जाधव, कैलास साळुंके, अजित फरांदे, सागर जगताप, मल्हारी सपुरे, साई रोकडे लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी केली आहे.